## थोडक्यात...

### अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या प्रांत पर्यावरण प्रमुखपदी डॉ. संगीता आवचार



**परभणी–** अखिल भारतीय ग्राहक पंचायत देवगिरी प्रांत पर्यावरण प्रमुखपदी परभणी येथील कै. सौ. कमलताई जामकर महिला महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. संगीता आवचार यांची निवड करण्यात आली आहे. छत्रपती संभाजीनगर येथे सोमवार (दि.९)जून रोजी झालेल्या देवगिरी प्रांत कार्यकारिणीच्या बैठकीत देवगिरी प्रांत अध्यक्ष डॉ. विलास मोरे यांनी डॉ. संगीता आवचार यांची निवड जाहीर केली आहे. यावेळी पश्चिम क्षेत्रीय संघटन मंत्री नितीन काकडे, प्रांत संघटन मंत्री रामदास ठोंबरे, प्रांत सचिव ओंकार जोशी, प्रा. डॉ. स्मिता अवचार, धनंजय मुळे, विधिज्ञ संगमेश्वर रासुरे, विधिज्ञ संगीता धुमाळ, रवींद्र पिंगळीकर, मंजुश्री ढेपे, प्रा. डॉ. संगीता आवचार, किरण बोचरे, दामोदर पारेख,विधिज्ञ दत्तात्रय पाटील, राजेश मेहता,विधिज्ञ संजय केकान यांच्यासह देवगिरी प्रांत पदाधिकारी उपस्थित होते. या निवडीबद्दल डॉ. संगीता आवचार यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

### युवा नेते शिवाजीराव मुटकुळे ठरले शेतकऱ्यांसाठी खरे देवदूत



(शिवा पाटील/दै.धर्मयोध्दा)

**सेनगाव -** तालुक्यातील कडोळी येथे बऱ्याच दिवसापासून शेतकऱ्यांना रस्त्याची खूप मोठी अडचण होती मात्र ही अडचण लक्षात घेता युवा नेते शिवाजीराव मुटकुळे यांनी अवघ्या दहा तासांमध्ये या रस्त्याचे काम पूर्ण करून दिले व शेतकऱ्यांना जाण्यासाठी रस्ता करून दिला हा रस्ता केल्यामुळे जवळपास कडोळी गावातील ५०% शेती ही ज्या बाजूला रस्ता केला आहे त्या बाजूलाच असल्यामुळे शेतकऱ्यांनी शिवाजी मुटकुळे यांचा सत्कार सुद्धा केला व पावसाळा लागायच्या आतच रस्त्याचे काम करून दिल्यामुळे शिवाजीराव मुटकुळे हे शेतकऱ्याचे देवदूतच झाले असे शेतकऱ्यांनी म्हटले आहे खरं पाहिलं तर या रस्त्याचा बऱ्याच दिवसापासून प्रश्न पेंडिंग होता मात्र गावातील भाजपचे कार्यकर्ते माझी पंचायत समिती सदस्य रामेश्वर राव देशमुख यांनी युवा नेते शिवाजीराव मुटकुळे यांच्या निदर्शनास आणून दिले व त्यांनी विलंब न करता अवघ्या दहा तासांमध्ये हा रस्ता पूर्ण करून दिला यावेळी गोरेगाव तालुका अध्यक्ष डॉक्टर रवी पाटील गजानन नायक भीमराव गांजरे पांडुरंग ह माने व शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्री संत गजानन महाराज यांच्या पालखीचे मराठवाड्याच्या प्रवेशद्वारावर दाखल होताच हजारो भाविकांनी केले स्वागत





(शिवा पाटील/ दै.धर्मयोध्दा)

**सेनगाव–** साधू संत येती घरा तोच दिवाळी दसरा गण गण गणांत बोते च्या गजरात भक्तिमय वातावरणात आज सकाळी सात वाजता श्रीची पालखी पानकनेरगाव नगरी दुमदुमली दाखल झाली आहे श्री संत गजानन महाराज पालखीचे ५६ वे वर्ष आहे वारकऱ्यांनी पांढरे वस्त्र परिधान करून हातात भगवे पताके घेऊन एकदम शिस्तीमध्ये चालणे या दिंडीची ही खास ओळख आहे पानकनेरगाव येथे जेसीबीच्या साह्याने साह्याने फुलांचा वर्षाव करण्यात आला

विदर्भाची पंढरी मानल्या जाणाऱ्या शेगाव येथील श्री संत गजानन महाराज संस्थानचा 'श्री'चा पालखीने पंढरपूर पायदळ वारीकरीता भजनी दिंडी, गज व अश्वासह आज २ जून रोजी सकाळी प्रस्थान केले. श्रींच्या पालखीचे हे ५६ वे वर्ष आहे. पालखी सोबत ७०० वारकरी असून जवळपास एकूण ७२५ कि मीचा रस्ता विठ्ठलाच्या जयघोषामध्ये १ महिन्यात पूर्ण करणार आहेत

संपुर्ण राज्यभरातून आषाढी एकादशीला श्री क्षेत्र पंढरपूरला विविध संतांच्या पालख्या दिंडीसह नेण्याची परंपरा वर्षानुवर्षांपासून आहे. शेगावचं गजानन महाराज संस्थानाकडून १९६८ पासून पंढरपूरला पायी वारी केली जाते. तीच परंपरा जोपासत श्री छेत्र शेगाव येथून ७०० वारकऱ्यासह टाळमृदंगाच्या गजरात विठ्ठलाचा नाम जयघोष करत भगवे पताके हातात घेऊन २ जून रोजी पंढरपूर कडे निघालेली होती श्री संत गजानन महाराज यांची पायदळ पालखी विदर्भातून १० दिवसाच्या प्रवासानंतर १२ जून रोजी सकाळी सात वाजता मराठवाड्याच्या प्रवेशद्वारावर आगमन झाले आहे दरवर्षी प्रमाणे यावर्षीही हिंगोली विधानसभेचे आमदार तानाजी मुटकुळे पाटील हे स्वागताला उपस्थिती लावतात यावेळी त्यांचे पुत्र शिवाजी मुटकुळे यांनी व तसेच मराठवाड्यातील भाविक भक्तांनी श्री संत गजानन महाराजांच्या पालखीचे फटाके लावून जल्लोषात स्वागत केले व तसेच मराठवाडा -विदर्भ अंतरावर काही अंतरावर असलेल्या पानकनेरगाव येथे मुख्य रस्त्यावर रांगोळी काढून फुलांची कमान तयार करून बँड लावून जेसीबीच्या साह्याने सकाळी नऊच्या दरम्यान येथे फुलांनी स्वागत करण्यात आले

मराठवाड्याच्या सीमेवर सेनगाव पोलीस प्रशासनाच्या वतीने तगडा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता

तसेच दुपारचे स्नेहभोजन व थोडी विश्रांती घेतल्यानंतर येथील जवळपासच्या खेड्यापाड्यातील भाविक भक्तांनी श्री संत गजानन महाराजांच्या पालखीचे दर्शन घेतले यावेळी परिसरात काही वेळ भक्तीमय वातावरण निर्माण होऊन काय मृदंगांच्या गजरात परिसर दुमदुमून गेला ५६वर्षाची परंपरा असलेल्या श्री संत गजानन महाराज शेगाव येथील ते श्री छत्र माझे माहेर पंढरी असलेल्या भेटण्यास चाललेल्या वारकऱ्यांचे भाविक भक्तांनी जागोजागी अल्पहार, चहापाणी, पानाचाविडा, बिस्कीटचे पूडे,व तसेच काही वस्तू यावेळी वारकऱ्यांना दिल्या जातात काही ठिकाणी तर वारकऱ्यांचे पाय धुवून स्वागत सुद्धा केले जाते पालखीमध्ये नेहमीप्रमाणे हत्ती घोडे व तसेच श्री संत गजानन महाराजांची मूर्ती रथावर पहावयास मिळाली पानकनेरगाव येथून विश्रांती घेतल्यानंतर १ च्या सुमारास महाराजांची पालखी शेणगाव कडे प्रस्थान झाली आहे १२ जून रोजी सेनगाव येथे मुक्कामी राहणार असल्याची माहिती आहे

## महावितरणच्या खांबावर काम करणाऱ्या कंत्राटी कामगाराचा विजेच्या धक्क्याने दुर्दैवी मृत्यू कुटुंबावर कोसळला दु:खाचा डोंगर

(शिवा पाटील/ दै.धर्मयोध्दा)

**सेनगाव -** हिंगोली महावितरण कडून सध्या मान्सूनपूर्व दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले आहेत अशाच प्रकारे दुरुस्तीचे काम दुरुस्तीचे काम करण्यासाठी कंत्राटी कामगार विद्युत पोलवर चढला होता मात्र काम करताना बंद करण्यात आलेला विद्युत प्रवाह अचानक कोणीतरी सुरू केल्याने कामगाराला विजेच्या जोरदार धक्का लागला व व कंत्राटी कामगार पोल वरून खाली कोसळून यात त्यांचा मृत्यू झाला आहे

सदरील घटना सेनगाव तालुक्यातील खडकी येथे घडली आहे कंत्राटी कामगार असलेला हिवरखेडा येथील



सखाराम शीरसागर अंदाजे वय ३५ हे खडकी येथे महावितरण चे काम करण्यासाठी गेले होते सदरील गावातील विद्युत पोलवर चढताना क्षीरसागर यांनी डीपीवरून फ्युज काढून काम करत होते मात्र अचानक कोणीतरी फ्युज टाकल्याने क्षीरसागर यांना जोराचा विजेचा झटका लागला व ते विद्युत पोल वरून खाली कोसळले क्षीरसागर यांना साखरा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात आणण्यात आले मात्र तब्येत सिरीयस असल्यामुळे हिंगोली येथे रेफर करण्यात आले मात्र तब्येत अतिशय सिरीयस असल्यामुळे नांदेड येथे पाठवण्यात आले होते नांदेड येथे जाताना वाटतच क्षीरसागर यांचा मृत्यू झाला आहे गेल्या दोन-तीन वर्षापासून शिरसागर हे महावितरण मध्ये कंत्राटी कामगार म्हणून काम करत आहेत क्षीरसागर यांनी घोरदरी येथील ३३ वरून परमिट घेतले होते का नाही याची चौकशी करणे गरजेचे आहे परमिट घेतल्याशिवाय क्षीरसागर हे काम देखील करत नव्हते

## वालूर येथील सरपंच संजय साडेगावकर अपात्र चौदाव्या वित्त आयोगातील निधीत अनियमितता प्रकरण भोवले

(अजहर खान/दै.धर्मयोध्दा)

**सेलू-** तालुक्यातील सर्वात मोठी ग्रामपंचायत असलेल्या वालूर गावचे सरपंच संजय साडेगावकर यांना अपात्र केल्याचा आदेश महाराष्ट्र राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी दिनांक २ जून २०२५ रोजी दिला आहे

सरपंच संजय साडेगावकर यांच्या विरोधात ग्रामपंचायत सदस्य लिंबाजी रामराव कुपनवार, चंद्रकांत हनुमंतराव चौधरी, धारूजी त्रिंबक धाबे यांनी सरपंचाच्या कार्यकाळात मोठ्या प्रमाणात कामात अनियमतता केल्याप्रकरणी पंचायत समिती सेलू येथे तक्रार केली त्या अनुषंगाने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या चौकशीतून सरपंच दोषी आढळल्याने त्याचा अहवाल छत्रपती संभाजी नगर येथे विभागीय आयुक्ताकडे पाठविण्यात आला त्या संदर्भात सुनावणी होऊन सरपंच साडेगावकर यांना दिलासा मिळून सरपंच पद वाचले होते. परंतु वालूर विकास आघाडीतील सदस्य चंद्रकांत हनुमंतराव चौधरी यांनी वेळोवेळी पाठपुरावा करून शासनाच्या ग्रामविकास मंत्रालयात ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांच्या न्यायालयात हे प्रकरण अपील दाखल केले

त्यानंतर वादी व प्रतिवादी यांचा युक्तिवाद पूर्ण होऊन सुनावणी झाली विभागीय आयुक्त छत्रपती संभाजी नगर यांच्या एक ऑगस्ट २०२४ रोजीच्या आदेशाविरुद्ध लिंबाजी कुपनवार व तीन सदस्यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ३९ (१ ) नुसार मंत्री ग्रामविकास यांच्या न्यायालयात अपील दाखल केले सदर प्रकरणी १८ मार्च रोजी सुनावणी पूर्ण झाली व प्रस्तुत प्रकरणी मंत्री ग्रामविकास यांनी पारित केलेला दोन जून रोजीचा अंतिम आदेश जोडून अति तात्काळ असा उल्लेख असलेला सरपंच संजय साडेगावकर यांचे सरपंच पद व ग्रामपंचायत सदस्यत्व अपात्र करीत असल्याचा आदेश ग्राम विकास मंत्रालयाचे अप्पर सचिव अजय पवार यांनी काढले आहे

सन २०१५ ते २०२० पर्यंत लेखापरीक्षण करण्यात आले नाही याप्रकरणी अधिक चौकशी होऊन जे कोणी दोषी असेल त्यांच्यावर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात यावे अभिलेख व्यवस्थित नसल्याने संबंधिताची चौकशी करावी अशी मागणी ग्रामपंचायत सदस्य चंद्रकांत हनुमंतराव चौधरी व लिंबाजी कुपनवार यांनी केली आहे.

# जिल्हा महिला रुग्णालयात किरीट सोमय्यांची आढावा बैठक

### रुग्णालयातून १ हजार ७१९ बनावट जन्म प्रमाणपत्र वाटप, सोमय्या यांचा आरोप; कदिम जालना पोलिसात तक्रार दाखल



(प्रविण जगताप/ दै.धर्मयोध्दा)

**जालना -**भाजपा नेते किरीट सोमय्या यांनी महिला व बालरूग्णालय येथे मंगळवारी दुपारी दोनच्या सुमारास आढावा बैठक घेतली. या रुग्णालयात १७१९ जन्म प्रमाणपत्र वाटपात घोटाळा झाला असल्याचा आरोप करत कदीम जालना पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी तक्रार दाखल केली आहे. सोबतच त्यांनी ९१९ जन्म नोंदी बोगस असल्याचा दावा केला आहे. जिल्हा महिला रुग्णालयातून २ हजार ५३२ जन्म प्रमाणपत्र देण्यात बिलंब केल्याचा आरोपही सोमय्यांनी केला. १ वर्षापेक्षा अधिक प्रलंबित जन्म नोंदीचे प्रमाणपत्र देण्याचा अधिकार जिल्हा दंडाधिकारी किंवा कार्यकारी दंडाधिकारी यांना असताना जिल्हा शल्यचिकित्सक अथवा वैद्यकीय अधीक्षक यांनी हा घोटाळा केला असून त्यांच्यावर कारवाई करावी अशी मागणी सोमय्या यांनी केली आहे. सोमय्या जालना दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी जिल्हा स्त्रीरुग्णालयातील जन्म प्रमाणपत्र वाटपाबद्दल माहिती घेतली. यावेळी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ राजेंद्र पाटील, जिल्हा शासकीय स्त्री - रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.एस.झेड. गवारे, डॉ.प्रदीप कुलकर्णी यांची उपस्थिती होती.त्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.बनावट जन्म प्रमाणपत्रांची चौकशी केली जाईल असे सोमय्या म्हणाले. या चौकशीत जो कोणी अधिकारी-कर्मचारी दोषी आढळेल त्याच्यावर फौजदारी कारवाई केली जाईल असा इशाराही सोमय्या यांनी दिला आहे.

## एक दिवस गावकऱ्यांसाठी कार्यक्रम संपन्न




(मुरलीधर गोंगे/ दै.धर्मयोध्दा)

**पाथरी -** तालुक्यातील पोहे टाकळी येथे दि ११/६/२५ रोजी एक दिवस गावकऱ्यांसाठी ग्राम दरबार कार्यक्रम ग्रामपंचायतच्या वतीने आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमात तालुक्यातील पंचायत समिती, शिक्षण,एकात्मिक बाल विकास, महसुल, पशुसंवर्धन, आरोग्य या सर्व विविध विभागांच्या अधिकारी यांनी उपस्थित राहून आप आपल्या विभागा मार्फत राबविण्यात येणार्या सर्व योजनांची इत्यंभूत माहिती व्यासपीठावर सादर केली.. यामुळे नागरीकांना शासनाच्या विविध योजनांची माहिती गावातच मिळाल्याने ह्या उपक्रमा बाबत समाधान व्यक्त केले.. सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सौ. प्रणितताताई शामराव गोंगे ह्या होत्या व उपसरपंच गणेश बागल श्री घुमरे साहेब कृषी विस्तार अधिकारी, श्रीमती जोशी कृ वि अधिकारी,श्री रेवणवार विस्तार अधिकारी,श्री पठाण ग्राम विस्तार अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली हे कार्यक्रम पार पाडण्यात आले.. तसेच डॉ सुरवसे साहेब विस्तार अधिकारी पाथरी श्री बोत आरोग्य निरीक्षक, श्रीमती गुंजोटीकर मैडम, महिला संघाच्या महिला प्रतिनिधी, आरोग्य सेवक, सेविका, आणि सर्व ग्रामपंचायत सदस्य व कर्मचारी, आशाताई व गावातील सर्व प्रतिष्ठित नागरिकांची उपस्थिती होती तर शेवटी ग्रामस्थांच्या वतीने मुरलीधर गोंगे शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रम संपन्न झाला असे जाहीर केले

# जो पर्यंत शेतकरी कर्जमाफी होणार नाही तो पर्यंत बेमुदत अन्नत्याग आंदोलन थांबणार नाही - शिवलिंग बोधने

### बच्चूभाऊ कडू यांच्या सोबत मोझरी अमरावती येथे चार दिवसापासून अन्नत्याग आंदोलन सुरू



**परभणी -** निवडणूक प्रचारात सरकारने दिलेला शब्द पाळून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कर्जमाफी द्यावी तसेच शेतीमालाला हमीभाव द्यावा, दिव्यांगाना ६ हजार रुपये मानधन मिळावे तसेच शहरी व ग्रामीण भागातील नागरिकांना समान ५ लाख रुपये घरकुलासाठी द्यावे व पेरणी ते कापणीच्या सर्व खर्च मार्फत करावा या प्रमुख मागणीसह इतर एकूण १७ मागण्यासाठी दि. ०८ जून २०२५ पासून मा. बच्चूभाऊ कडू यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाधी स्थळ गुरुकूंज मोझरी, जिल्हा अमरावती येथे बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरु आहे. बेमुदत अन्नत्याग आंदोलनामध्ये प्रहार जनशक्ती पक्षाचे परभणी जिल्हा प्रमुख शिवलिंग बोधने, दीपक खुडे, अशोक मस्के यांच्यासह १२ पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह बेमुदत अन्नत्याग आंदोलनास बसलेले आहेत. आज अन्नत्याग आंदोलनाचा चौथा दिवस असून अन्नत्याग मुळे शिवलिंग बोधने यांची तब्येत खालावली असून त्यांना रक्तदाब कमी झाला आहे. बच्चुभाऊ कडू यांच्या विनंती वरून शिवलिंग बोधने त्यांनी रक्तदाबाची गोळी सुरू केली आहे. अशा परिस्थितीतही जोपर्यंत मागण्या मान्य होत नाही तोपर्यंत आंदोलन थांबणार नाही अशी भूमिका शिवलिंग बोधने यांच्यासह इतर सर्व उपोषणकर्त्यांनी घेतली आहे.

## अवैध दारू विक्रेत्यांना कार्यालयात बोलावून पोलीस अधिक्षक यांची तंबी खबरदार अवैध दारू विकाल तर एमपीडीए अंतर्गत कारवाई करू



(महेंद्र पुरी/दै.धर्मयोध्दा)

**हिंगोली -** जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी हिंगोली जिल्हयातील अवैध दारू विक्रेत्यांना ११ जुन रोजी पोलीस अधिक्षक कार्यालयात बोलावुन चांगलीच झाडाझडती घेतली. तसेच त्यांच्यावर कठोर प्रतिबंधक कार्यवाही करून यापुढे अवैध दारू, हातभटटी दारू विक्री करतांना आढळुन आल्यास एमपीडीए, हददपार, संघटीत गुन्हेगारी सारखी कठोर कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगीतले.

हिंगोली पोलीस दलातर्फे अवैध दारू विक्री विरोधात नेहमीच कठोर कार्यवाही करण्यात येत असुन यापुढे सुध्दा पोलीस ठाणे स्तरावर विशेष पथकाची स्थापना करून अवैध दारू हातभटटी विकणाऱ्यावर कार्यवाही करून अटक करण्यात येणार आहे. जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन, स्थानिक गुन्हे शाखा, विशेष पथक यांना विशेष मोहिमेव्दारे अवैध दारू विक्री विरोधात कठोर कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्या आहेत. त्याअनुषंगाने कळविण्यात येते की, हिंगोली जिल्हयात कोणीही अवैध दारू, हातभटटी, नशा कारक पदार्थ याची विक्री, वाहतुक किंवा निर्मिती करू नये व स्वतः जवळ बाळगु नये असे आवाहन पोलीस विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

**वाईन शॉप, देशीदारू दुकानांवर होणार का कारवाई?**

हिंगोली जिल्हा पोलिस अधीक्षक श्रिकृष्ण कोकाटे यांनी अवैध धंद्यावर कारवाई चा बडगा उगारला असुन दररोज कारवाई होत आहे. मात्र हिंगोली शहर व जिल्ह्यात असलेल्या काही परवाना धारक देशी विदेशी वाईन शॉप वरून खूले आम अवैध देशी विदेशी दारू खेड्या पाड्यात विक्री साठी नेण्यात येत आहे. अशा वाईन शॉप मालकावर पोलिस अधीक्षक काय कार्यवाही करतात याकडे जिल्ह्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्म योध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक-शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published A√t Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao